आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२६ मार्च २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पारलिंगी हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक मागे घेण्याची सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीची केंद्र सरकारला सूचना

- देशभरात रामनवमीचा उत्साह, राज्यात शोभायात्रांसह विविध कार्यक्रमांचं आयोजन

- आंध्र प्रदेशात झालेल्या रस्ते अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू, तर २८ जण जखमी

**आणि**

- ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

<><><><><>

पारलिंगी हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक, २०२६ मागे घेण्याची सूचना, सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीनं केंद्र सरकारला केली आहे. हे विधेयक नुकतंच संसदेत मंजूर झालं होतं. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आशा मेनन यांच्या अध्यक्षतेखालच्या या समितीनं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाला पत्र लिहून, या दुरुस्तीतल्या काही तरतुदींविषयी गंभीर चिंता व्यक्त करत, कायद्याचा पुनर्विचार करायला सांगितलं आहे. या दुरुस्तीमुळे स्व-ओळख हक्क आणि गोपनीयतेवर मर्यादा येत असल्याचं निरीक्षण समितीनं नोंदवलं. नवीन कायद्यात अपहरण आणि शोषण यांसारख्या गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षा प्रस्तावित आहेत, परंतु हे गुन्हे आधीच इतर कायद्यांतर्गत समाविष्ट असल्याचं समितीनं नमूद केलं आहे.

स्व-ओळख काढून टाकणं हे २०१४ च्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी विसंगत आहे. त्यामुळे भविष्यातली दुरुस्ती पारलिंगींशी सल्लामसलत करूनच करावी, असंही समितीनं म्हटलं आहे. ही समिती न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि के.व्ही. विश्वनाथन यांच्या पीठानं स्थापन केली आहे. रोजगार, आरोग्य आणि सार्वजनिक सेवांमध्ये पारलिंगींना येणारे अडथळे तपासणं, आणि २०१९ च्या कायद्याची अंमलबजावणी सुधारण्यासाठी उपाय सुचवणं हे या समितीचं काम आहे.

**<><><><><>**

हॉटेलं तसंच खानपान-गृहांसारख्या आस्थापनांनी एलपीजी गॅस किंवा इंधन शुल्क या नावाखाली कोणतंही अतिरिक्त शुल्क आकारू नये असा आदेश केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं दिला आहे. अशा शुल्क आकारणीची तक्रार १९१५ या हेल्पलाईन क्रमांकावर किंवा राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईनच्या मोबाईल ॲपवर करता येईल. जिल्हाधिकारी किंवा थेट प्राधिकरणाकडेही याची तक्रार करता येईल.

**<><><><><>**

आखाती देशांमधल्या युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेत राज्य सरकारने पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार राज्यात मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये तिन्ही सरकारी तेलकंपन्यांकडून प्रत्येक शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीन चं वाटप केलं जाणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही, अशी कुटुंब देखील केरोसीनच्या उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. केरोसीनचे दर राज्य सरकारकडून स्वतंत्रपणे जारी केले जाणार आहेत. किरकोळ केरोसीन परवानाधारक आणि रास्तभाव दुकानांच्या माध्यमातून नागरिकांना केरोसीन वितरीत केलं जाईल.

**<><><><><>**

आज चैत्रशुद्ध नवमी अर्थात रामनवमी. देशभरात आज रामनवमी उत्साहात आणि भक्तिभावानं साजरी होत आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

**- - व्हीसी - - -**

*(रामनवमीनिमित्त देशभरातल्या राम मंदिरांमध्ये रामजन्म सोहळ्यासह विविध कार्यक्रम होत आहेत. अयोध्येत राम मंदिरात आज सकाळी रामलल्लांच्या मूर्तीला अभिषेक करून पूजा आणि आरती करण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रभू रामांचं संपूर्ण जीवन आपल्याला समाजाप्रति असलेल्या कर्तव्यांचं पालन करण्याची देखील प्रेरणा देत असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी*

*यांनीही रामनवमीनिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.*

*राज्यात विविध राममंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली आहे.* ***नागपुरा****तल्या ऐतिहासिक पोद्दारेश्वर राम मंदिर आणि रामनगरच्या श्रीराम मंदिर इथून निघणाऱ्या भव्य मिरवणुकांच्या स्वागतासाठी संपूर्ण शहर सजलं आहे. मंदिरांमध्ये पहाटेपासूनच दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. यावर्षी दोन्ही मिरवणुकांमध्ये ८०हून अधिक चित्ररथांचा समावेश आहे. पोद्दारेश्वर राम मंदिरातल्या रथयात्रेच्या पूजनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.*

***बीड*** *शहरात रामनवमीनिमित्त मोटर सायकल रॅली निघाली.* ***अकोला*** *शहरात राम मंदिरात अलोट गर्दी उसळली. महाराणा प्रताप बाग चौकात अठरा फूट उंच हनुमान देखावा उभारण्यात आला आहे. शहरातील ३५ राम मंदिरांमध्ये दुपारी बारा वाजता रामजन्म सोहळा साजरा झाला. तसेच अन्नदान कार्यक्रमाचं आयोजन आणि एक मोटरसायकल रॅली देखील काढण्यात आली.*

***धुळे*** *शहरात आज सकाळी बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीत श्रीराम, सीता माता, लक्ष्मण, हनुमानाच्या तसेच वानरसेनेच्या रुपातील बालकांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.* ***धाराशिव****मध्ये रामनवमी निमित्त आज भगवा ध्वज यात्रा, रक्तदान शिबिरांचं आयोजन करण्यात आलं तसंच स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.)*

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात मार्कापुरम जिल्ह्यात रायवरमजवळ आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला, तर २८ जखमी झाले. खासगी प्रवासी बसची टिपर ट्रकशी टक्कर झाली आणि बसला आग लागली. तेलंगणातल्या जगतियालहून ही बस नेल्लोर जिल्ह्याकडे जात असताना हा अपघात झाला. जखमींना तातडीनं जवळच्या रुग्णालयांत उपचारासाठी हलवण्यात आलं. पोलीस आणि बचाव पथकं अपघातानंतर लगेच घटनास्थळी पोहोचली आणि त्यांनी बचावकार्य सुरू केलं. जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर आहे. गंभीर जखमींना अधिक चांगल्या उपचारासाठी ओंगोलेच्या रुग्णालयात हलवलं असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रति शोकभावना व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं आज कोल्हापूर इथं निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज कोल्हापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात लोककल्याणकारी राज्य निर्माण करुन त्या राज्याची घडी आधुनिक जीवन मूल्यांनुसार बसवली हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू पवार यांनी प्रकाशात आणला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचा लढा सुरू ठेवणाऱ्या तसंच करवीर संस्थानच्या संस्थापिका महाराणी ताराराणींचं चरित्र पवार यांनी लिहिलं आहे.

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक - सदस्य आणि नंतर तीन वर्षांसाठी अध्यक्ष होते. त्यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी या संस्थेची स्थापना केली होती.

पवार यांच्या निधनानं तत्वनिष्ठ, व्यासंगी आणि शांतपणे काम करणारा संशोधक हरपला आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. महाराष्ट्राच्या वैचारिक आणि ऐतिहासिक संशोधन क्षेत्राची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध गायक झुबीन गर्ग यांचा सिंगापूरजवळच्या एका बेटावर झालेला मृत्यू हा अपघातच असून यात कोणत्याही घातपाताची शक्यता नाही असं आसाम राज्य न्यायवैद्यक विभागानं म्हटलं आहे. सिंगापूर पोलीस तटरक्षक दलाच्या अहवालावर झुबीन गर्ग यांच्या पत्नीनं आक्षेप घेतला होता, यावर हा अहवाल सखोल तपास केल्यावरच तयार केल्याचं न्यायवैद्यक अधिकारी ॲडम नखोडा यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**